

# लाईफ, जिंदगी, जीवन

## आज आहे, उद्या नाही...

## भाग २



पवन अनिल सोनवणे



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# लाईफ, जिंदगी, जीवन -२

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# लाईफ, जिंदगी, जीवन

## भाग-2

लेखक

## पवन अनिल सोनवणे

# लाईफ, जिंदगी, जीवन भाग-2

## लेखक... पवन अनिल सोनवणे

फोन नंबर - +९१ ८९७५१८४१३७
ईमेल – pawansonawane969@gmail.com
पत्ता- प्लॉट नं-८७, स्वामी विहार, जळगाव रोड, भुसावळ.(४२५२०१)
जि.जळगाव

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २२ डिसेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड
करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत

नमस्कार मी पवन, ई साहित्यावरील माझे हे दुसरे पुस्तक.

आजच्या दिवसांत सर्व जगभर धुमाकूळ घातलेल्या कोरोना ह्या महामारीने त्रस्त असलेल्या लोकांच्या जीवनात छोटासा, अगदी दिव्या इतका प्रकाश देण्याचा माझा “लाईफ जिंदगी जीवन भाग-२” ह्या पुस्तकरूपी छोटासा प्रयत्न. माणसाच्या आयुष्यात येणारी संकटे आणि त्या आलेल्या संकटांना तोंड देत केलेला प्रवास आपण “लाईफ जिंदगी जीवन भाग १” मध्ये पाहिला.

आताच्या लॉकडाऊनच्या काळात आलेले वाईट अनुभव व त्यातून घेतलेला धडा हे प्रत्येकाला चांगलेच ठाऊक आहे. असे वाईट प्रसंग कोणावरही येऊ नये याची प्रत्येक जण ईश्वरचरणी प्रार्थना करत आहे. कोरोनाच्या महामारीत असलेल्या लॉकडाऊन मध्ये प्रत्येकाला आपल्या घरातील, परिवरातील आणि परिचीत प्रत्येक व्यक्तीला जाणून घेण्याची संधी मिळाली. प्रत्येकाला आपल्या आप्तेष्टांचे एखाद्या नाण्याप्रमाणे दोन्ही रुपे पाहावयास मिळाली.

पहिलेच लग्नाचे वय झालेले असताना देखील लग्न ठरत नसल्यामुळे त्रस्त मुलगा किंवा मुलगी, लग्न ठरलेले असताना शासनाने

दिलेली ५० जणांची परवानगी व त्यातही हसतखेळत, रडतखडत झालेली लग्ने, प्रत्येक लग्नात केलेला विधवा स्त्रीचा अपमान, आपण गंभीर संकटात असताना आपल्या शेजाऱ्यांनी व आप्तेष्टांनी आपल्याला दिलेला किंवा न दिलेला भावनिक आणि भौतिक आधार, संपूर्ण लॉकडाऊन काळात अगदी २४ तास साथ न सोडलेल्या व आपली कामे अगदी चुटकीसरशी पूर्ण करून दिलेल्या मोबाइल, कामानिमित्त बाहेर असणाऱ्या लोकांना घरी गावाकडे परतल्यानंतर आश्रय दिलेले झोपडीवजा घर या सर्वांचा सुरेख ताळमेळ बसवून ते सर्व एका पुस्तकरूपी माळेत गुंफन्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

प्रस्तुत पुस्तकात सांगितलेल्या प्रत्येक घटकाचा आपल्या जीवनाशी घडलेल्या वा घडणाऱ्या घटनांशी मेळ घालून जीवन सुखकर बनवण्याचा प्रयत्न करणे ही विनंती. ह्या विनंतीवजा मागणीला मान देऊन उर्वरित आयुष्य सुखासमाधानाने व्यतीत प्रयत्न करून इतरांनाही तसे करण्यास प्रोत्साहित करावे.

“एक मुंगी भिंतीवर चढत असताना हजारदा खाली पडते पण इच्छित स्थळी पोहचल्याशिवाय थांबत नाही” याचप्रमाणे जीवनात येणाऱ्या हजार संकटांना तोंड देत जीवन एखाद्या योध्याप्रमाणे जगून इतरांसाठी देखील तसे जीवन जगण्याचा आदर्श निर्माण करून देणे कधीही चांगले.

"वाचाल तर अजून लढू" या उक्तीप्रमाणे प्रत्येक दिवस स्वत:ची आणि सर्वांची काळजी घेत जागा. एक दिवस ह्या कष्टाचे फळ चाखल्यावाचून तुम्ही राहणार नाहीत. फक्त संयम बाळगा.

"ई साहित्य प्रतिष्ठान" नावाचा वटवृक्ष त्याच्या प्रच्छायेसाठी आम्हाला उपलब्ध करून देणाऱ्या सुनील सामंत सर आणि टीम चे मनस्वी आभार..

**पवन अनिल सोनवणे**

**MBA -FINANCE**

# परिचय



पवन अनिल सोनवणे

+९१ ८९७५१८४१३७

प्लॉट नं-८७, स्वामी विहार,

जळगाव रोड, भुसावळ.

जि.जळगाव(४२५२०१)

pawansonawane969@gmail.com

शिक्षण – **BE Mechanical Engineering**. सध्या **MBA- FINANCE MANAGEMENT** च्या अंतिम वर्षाला आहे. लवकरच कॉर्पोरेट जीवनात प्रवेश करणार आहे.

सोबतीला लिखाणाची व वाचनाची आवड खूप आहे. अच्युत गोडबोले सरांची "मनात" कादंबरी, अमिष यांचे "सीता द वॉरीयर" हे इंग्रजी पुस्तक माझे आवडते पुस्तके आहेत. रश्मि बंसल यांचे "स्टे हंग्री स्टे फूलिश" यात दिलेले उद्योजकांचे अनुभव आपल्याला जीवन जगण्याची प्रेरणा देतात. मला दोन्ही इंग्रजी आणि मराठी भाषेतील काल्पनिक तसेच ऐतिहासिक पुस्तके यांची आवड आहे.

लिखाण केलेलं आहे पण स्वत:ला व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळत नव्हते. ई-साहित्य च्या रूपाने एवढं मोठं व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम चे आभार. लाइफ जिंदगी जीवन भाग १ आणि भाग २ वाचण्यास उपलब्ध आहेत. एका रहस्यमय असलेल्या अश्या कथेचे लिखाण सुरू आहे. लवकरच ई- साहित्य वर प्रकाशित करण्याबद्दल प्रयत्नशील आहे.




**लाईफ, जिंदगी, जीवन**

पहिला भाग वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा

# अर्पणपत्रिका

अर्थातच मानव जन्म घेऊन ह्या सुंदर अश्या

जगात जीवन व्यतीत करणाऱ्या सर्व मानव मित्रांना...

# लाईफ, जिंदगी, जीवन

## आज आहे, उद्या नाही…

## भाग २

# अस्वीकरण

प्रस्तुत पुस्तकातील सर्व पात्र, घटना, स्थळ हे काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# अनुक्रमणिका

1. सकाळची रपेट
2. आपण आणि आपले शेजारी
3. लग्नाचे वय
4. विधवेचे जीवन
5. बसचा प्रवास
6. शेणामातीची झोपडी
7. मोबाइल आणि तंत्रज्ञान
8. कामापुरता मामा

# सकाळची रपेट

सूर्योदयापूर्वी उठून आपापल्या कामाला लागावे असे आपण बऱ्याच जणांकडून ऐकतो, त्याला काही तथ्य आहे म्हणूनच तर ते कोणी आपणास सांगत असतात की लवकर निजावं आणि लवकर उठावं. प्रात:काळी उठण्याने सर्वात जास्त आपल्याला काही मिळत असेल तर ती आपल्या हक्काची वेळ असते, सकाळी कोणीच नसल्याने आपल्याला “स्व”शी बोलायला, स्वत:चे आत्मचिंतन करण्यास वेळ भेटतो. खूप काही कल्पक गोष्टी ह्या सुचत जातात, माणूस स्व चा अनुभव घेत घेत छानपैकी प्रत्येक क्षण उपभोगत असतो.

ग्रामीण भागात सहसा सकाळी ४-५ वाजता उठून तिथली लोक कामास सुरुवात करतात. सहसा जास्त प्रमाणावर शेतकरी वर्ग गावात राहत असल्याकारणाने आणि जोडीला पशुपालन हा जोडधंदा करत असल्यामुळे त्यांच्या कामाची सुरुवात इतरांच्या मानाने लवकरच होते. गाई-म्हशींचा शेणपुंजा करणे असो, त्याची साफसफाई करणे असो, त्यांची धार काढणे असो, नंतर ते काढलेलं दूध दूधकेंद्रात पोहचवणे असो अश्या प्रकारची सर्व कामे लवकर आपटून ऊन नाही येत तोवर शेतकरी राजा शेतावर हजर असतो. सकाळच्या रम्य, शांत वातावरणात कामास मन देखील लागते म्हणून लवकर लवकर कामे आपोटून घरी जाण्याचा मानस प्रत्येक शेतकऱ्याचा असतो.

वरील वातावरणाच्या अगदी विपरीत स्थिती शहरी भागात राहणाऱ्या लोकांची असते. पहाटे ४ वाजता तर कुठे ते झोपायला जातात. रात्रपाळी किंवा खूप वेळपर्यंत रात्री काम करत बसणे, युवावर्ग चॅटिंग, वेब सिरीज बघत झोपण्यास ३-४ वाजवतात, काही युवा अभ्यास देखील करत असतात. बहुतेक शहरात असेच वातावरण असते, मग ४ वाजता झोपी गेलेले लोक १०-११ वाजता उठून तयार होतात आणि ऑफिसला निघून जातात, आल्यावर परत काम करत बसतात, असे हे चक्र चालूच असतं. सुटीच्या दिवशी कोठे त्यांना वेळ भेटतो, त्यात पण आठवड्याभरचा थकवा दूर करण्यासाठी खूप वेळ ते झोपाच काढतात आणि उरलेला मौल्यवान वेळ आपल्या परिवारासोबत घालवतात.

सकाळच्या निसर्गरम्य वातावरणातील शुद्ध गार हवा, भरपूर मात्रेत उपलब्ध असलेला प्राणवायू, कोंबड्याची बांग, विविध पक्ष्यांची किलबिल, गावाबाहेर गेल्यास जंगलातून येणारे प्राण्याचे आवाज या सर्वांना साक्षीदार होण्याची सुवर्णसंधी ही पहाट प्रत्येकाला देत असते. ग्रामीण भागात प्रात:विधीला शक्यतो बाहेरच जातात, त्यात न कळत त्यांचं फिरणं पण होऊन जातं.

सकाळची रपेट का महत्वाची आहे?

सकाळच्या हवेत भरपूर प्रमाणात प्राणवायू असतो, प्रदूषण कमी असल्याकारणाने श्वास-उच्छवासास वाव मिळतो, शरीर चांगले,

सदृढ राहण्याकरीता केलेली शारीरिक कसरत, एखाद्या ठिकाणी बसून केलेले श्वसनाचे व्यायाम, चिरकाळ टिकणारे सौन्दर्य प्राप्त करून घेण्यासाठी सकाळी केलेला हास्याचा व्यायाम ह्या सर्व गोष्टींसाठी सकाळची रपेट महत्वाची असते. सकाळी सकाळी निदान स्वत:सोबत अर्धा तास देखील घालवला तरी उरलेल्या संपूर्ण दिवसाचं नियोजन आपल्याला करता येते.

सकाळच्या रपेट मधून आपल्या मनास आनंद, शरीरास शांतता, “स्व”ला ओळखण्यासाठी वेळ, आपल्या आत्म्याशी बोलण्याची एक सुवर्णसंधी, स्वत:शी केलेलं भाष्य, पुढच्या उर्वरित जीवनात प्राप्त करावयाच्या ध्येयांवर टाकलेला एक कटाक्ष, सुखाचा स्वीकार, दुःखाचा विसर, कालपर्यंत रंगवलेली स्वप्ने आणि त्यांना सत्यात उतरवण्यासाठी भेटलेली ऊर्जा हे सर्व काही अनुभवता येते.

रम्य अश्या पहाटे नदीकाठी फिरायला गेलेले तुम्ही सर्वात प्रथमत: एक मनास आल्हाद देणारी शांतता अनुभवता. ज्यात तुम्ही इतके देहभान विसरून जाता की जवळ असलेल्या मोबाइलवर काय गाणे चालू आहेत किंवा कोणी आसपास असलेला माणूस काय बोलतोय याचेही भान राहत नाही. शुद्ध अश्या वातावरणात जास्तीत जास्त ऑक्सिजन आत घेण्याची स्पर्धा दोन्ही नाकपुडीत लागलेली असते. आजूबाजूस संपूर्ण दिवसभर असणारा कसलाही गोंगाट अनुभवयास मिळत नाही. आवाज येतो तर तो फक्त पक्ष्यांचा

किलबिलाटचा, असं वाटतं की हे सगळे पक्षी संपूर्ण जगास उठावयास संगत आहेत. उठा आणि ह्या मनोहरणीय अश्या निसर्गाचा आस्वाद घ्या. पुढे गेल्यावर अर्ध्या वाटेवर होणारे सूर्यदर्शन आणि त्याचे नदीच्या पाण्यात पडलेले प्रतिबिंब मनास एक प्रकारचा आल्हाददायक आनंद देऊन जातं. अश्या प्रसन्न वातावरणात पक्ष्यांच्या किलबिलाटासह होणाऱ्या सूर्योदयाचे आणि त्याचे प्रतिबिंब पाण्यात पाहण्याचे भाग्य फक्त काही लोकांनाच लाभते. तुम्ही देखील याचे मानकरी होऊ शकतात, गरज आहे फक्त लवकर उठून सकाळची रपेट मारण्याची...

सकाळची रपेट आपल्या जीवनात का महत्वाची असते हे एका उदाहरवरून पाहुया.

एक होता पिंट्या. पिंट्याचे आजोबा नुकतेच सेवानिवृत्त झाले होते, दिवसभर काहीच काम नसल्याकरणाने त्यांना शारीरिक व्याधी जडल्या होत्या. त्यातच डॉक्टर ने त्यांना सकाळी फिरायला जाण्याचा सल्ला दिला. त्यांनी तो सल्ला ऐकला आणि प्रत्यक्षात कृती करण्यास सुरुवात केली. ते दररोज सकाळी साडेपाचच्या सुमारास रपेट मारायला जाऊ लागले आणि आश्चर्य झाले, ते १५ एक दिवसात एकदम ठणठणीत बरे झाले. पुढे पुढे ते पिंट्याला म्हणजे नातवाला पण फिरायला घेऊन जाऊ लागले. दमा आजाराने ग्रस्त पिंट्यादेखील बरा झाला. पिंट्याला पाहून त्याचे मित्र देखील सकाळी लवकर उठून त्याच्यासोबत सकाळची रपेट मारायला जाऊ लागले. ते तिथेच एका

ठिकाणी बसून शारीरिक कसरती, श्वसनाचे व्यायाम करू लागले. आजोबांसोबत कॉलनीतील अजून सेवानिवृत्त झालेले आजोबा लोक सकाळी येऊ लागले. त्यांनी एक हास्य क्लब चालू केला. सकाळी फिरून झाल्यावर ते पण हलकेफुलके व्यायाम करून स्वत:ला ताजेतवाने ठेऊ लागले. आजोबांचा नवा मित्रपरिवार निर्माण झाला. पुढे खूप वर्षे त्यांनी जीवनाचा आस्वाद घेतला.

वरील उदाहरणावरून असे दिसून येते की सकाळची रपेट तुम्हाला एकदम नैसर्गिकरीत्या एखाद्या व्याधीतून मुक्त करू शकते. तर सर्वांनी आस्वाद घ्या असे खूप सारे फायदे देणाऱ्या सकाळच्या रपेटचे……

# आपण आणि आपले शेजारी

आपल्या मराठी भाषेत खूप साऱ्या म्हणी आणि वाक्प्रचार आहेत. त्यांचा वापर दैनंदिन जीवनात मराठी भाषा बोलताना केला जातो. अश्याच काही म्हणी आहेत जसे की, "जशास तसे" याचा अर्थ आसा आहे की आपण जसे वागू आपल्याला तसेच फळ मिळेल. आपण समोरच्या व्यक्तीशी आदरपूर्वक बोललो तर त्याबदल्यात तिकडून सुद्धा आदरपूर्वकच भाष्य केले जाईल आणि जर का आपण शिवीगाळ केली तर समोरील व्यक्ती देखील शिव्यांची लाखोली वाहिल्याशिवाय राहणार नाही. अजून एक म्हण आहे, "देश तसा वेश" याचा अर्थ असा आहे की आपण ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणचे वातावरण, तिथली संस्कृती आपण आत्मसात करायला हवी, जेणेकरून आपल्याला तिथे वास्तव्य करण्यास सोपं जाईल. ह्या म्हणींचा उल्लेख या करिता केला की त्या आपल्या विषयाला समर्पक आहेत.

आपण आपल्या सभोवतालच्या लोकांशी, आपल्या नातेवाईकांशी, आपल्या परिवरातील सदस्यांशी, आपल्या सोसायटीमधील, आपल्या कॉलनीतील लोकांशी कसे वागतो यावरच त्याची प्रतिक्रिया अवलंबून असते. मात्र खूप काही वेळा त्यांचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा वेगळा असून ते परिणामत: आपल्या बरोबर उलट प्रतिक्रिया आपल्याला देतात, यातूनच भांडण,

तंटे, अबोला इत्यादी प्रकार उद्भवतात. शेजार म्हटलं की तोंडावर तोंड पडणार आहे, दररोज आमनासामना होणार आहे. अश्या वेळेस दोन्ही पक्षातील लोकांनी सामंजस्याची भूमिका घेऊन आपापसातील तंटे मिटवून गोडीगुलाबीने राहणे नेहमी श्रेयस्कर ठरते. ‘एकमेकांसाहाय्य करू’ या उक्तीप्रमाणे वागत एकमेकांच्या सुख-दु:खात सभागी होऊन प्रत्येकाला त्याच्या कठीण प्रसंगी मदत केली पाहिजे.

दोन प्रकारचे शेजारी प्रत्येकाला मिळतात. चांगले आणि वाईट. दोन्ही आपल्यासाठी चांगले असतात. चांगले शेजारी असतील तर आपलं त्यांच्यासोबत खूप जास्त पटतं आणि आपण खूप वेळ त्यांच्यासोबत घालवू शकतो. मंगल प्रसंगी भेटगाठ होते तर दुःखाच्या वेळी भावनिक साथ फक्त आणि फक्त चांगले शेजारीचं देऊ शकतात. तुमच्या अडचणीच्या वेळी तेच मदत करतात. त्यामुळे आपले आणि त्यांचे सलोख्याचे संबंध निर्माण होतात, आपुलकी आणि जिव्हाळा वाढीस लागतो. प्रेमाचा वर्षाव होतो. तर वाईट शेजाऱ्यांबद्दल बोलायचे झाल्यास सतत भांडण, अबोला, द्वेष, मत्सर, राग, दुसऱ्याच्या प्रगतीवर जळफळाट होणे इत्यादी गोष्टी बघावयास मिळतात. आपल्याबद्दल लोकांमध्ये वाईट गोष्टी पसरवण्याचे काम देखील ते करतात.

दसरा, दिवाळी, होळी यांसारखे सण, गणपती-देवी यांसारखे सार्वजनिक उत्सव साजरे करतांना आपण एक सामाजिक प्राणी असून त्या दृष्टीने पाहिल्यास आपल्याला त्यावेळेस शेजाऱ्यांची उणीव जाणवते. शेजाऱ्यांसोबत सणवार, काही उत्सव साजरे केल्यास

माणसांमधील आपापसातील प्रेम वाढीस लागून त्या सणाचा आनंद द्विगुणित होतो. चांगला शेजारी तुमच्या प्रगतीवर, तुमच्या केलेल्या कार्यावर वाहवा करतो, तुमचे अभिनंदन करून तुमच्या आनंदात सहभागी होतो. तर वाईट शेजारी तुमची प्रगती पाहून नाक मुरडतो.

खूप जण म्हणतात की “निंदकाचे घर असावे शेजारी”, या उक्तीप्रमाणे जर फक्त गोड गोड बोलणारे शेजारी असतील तर तुम्हाला तुमच्या चुका लवकर निदर्शनात नाही येत, याउलट निंदक नेहमी नाखुशी दाखवून आपली चूक आपल्या निदर्शनात आणून देतो. आपल्याला अजून प्रगती करण्यास वाव मिळतो. निंदक निंदा करून आपल्याला एक सूचक इशारा देत असतात की तुमचं कार्य अजून अपूर्ण आहे, आमचं मन नाही भरलं नाही आहे, आम्हाला अजून अपेक्षा होती जी तुम्ही पूर्ण नाही करू शकणार. प्रत्येकाचा घराजवळ एक चांगला आणि एक वाईट शेजारी असतोच. दोघांकडून आपल्याला शिकायला मिळतं, फक्त नजर तशी असली पाहिजे.

फक्त घराजवळच नाही तर तुमच्या ऑफिस मधील सहकारी, रेल्वेमधून प्रवास करताना चे सहप्रवासी, दवाखान्यात भरती असल्यास तुमच्या शेजारील रुग्ण हे देखील शेजारीच असतात आपले, फक्त जागा निराळी असते. तिथेही भांडणं होतात, बोलाबोल होते. फक्त समजून घेणारा बाजी मारून जातो आणि आपल्या कामाशी काम ठेऊन त्या शेजाऱ्यास त्याची चूक लक्षात आणून देतो.

शेजाऱ्यांची तुमच्या जीवनात काय भूमिका असते हे एका उदाहरणावरून पाहूया..

एका नामांकित सोसायटीमध्ये घोरपडे नावाचे एक सेवानिवृत्त झालेले वृद्ध जोडपे राहत होते. त्यांचा मुलगा विदेशात एक चांगल्या पदावर कार्य करत होता. त्यांचे सर्वांसोबत सलोख्याचे संबंध होते, सर्व जणांकडे येणेजाणे होते. म्हणजेच ते स्वभावाने चांगले होते. एका दिवशी भल्या पहाटे त्या आजोबांना हृदयविकारचा तीव्र झटका आला, आजी तर ते दृश्य पाहून पूर्ण गर्भगळीत झाल्या. त्यांना काय करावे सुचत नव्हते. तरी मोठ्या हिम्मतीने त्यांनी एका शेजाऱ्यास फोन लावला, तो फोन ऐकताचक्षणी थोड्याच वेळात सर्व जण हजर झाले, त्यांनी आजोबांना इस्पितळात दाखल केले. वेळीच इस्पितळात दाखल केल्यामुळे आजोबांवर उपचार झाले आणि आजोबांचे प्राण वाचले. याऐवजी फोन करून कोणी त्याची दखल घेतली नसती तर कदाचित ते आजोबा प्राणास मुकले असते आणि आजींचा संसार उघड्या वर पडला असता.

वरील उदाहरवरून असे दिसून येतं की तुम्ही जसं पेराल तसं उगवेल, त्या आजी आजोबांनी आधीच सर्वांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून सर्वांचे मन जिंकून ठेवले होते, सर्वांशी मिळून मिसळून राहत असल्याकारणाने त्यांचा आणि इतर लोकांचा एकमेकांवर विश्वास होता. त्या मुळेच जेव्हा घोरपडे कुटुंबावर संकट उभं ठाकलं

तेव्हा सर्वांनी धावाधाव करून आजोबांना इस्पितळात दाखल केले आणि त्यांचे प्राण वाचवले.

सर्वांनी आपल्या शेजाऱ्यासोबत चांगले संबंध प्रस्थापित करून एकमेकांच्या चांगल्या आणि वाईट काळात साथ न सोडता भक्कमपणे उभे राहिलं पाहिजे. सर्व आपल्या कृतीवर अवलंबून आहे. हे सर्व आपल्या हातात आहे की कसे असले पाहिजे आपण आणि आपले शेजारी.......

# लग्नाचे वय

"घर पाहावे बांधून आणि लग्न पाहावे करून" खूपदा असं बोलता बोलता ऐकण्यात येतं. कारण दोन्ही गोष्टी करत असताना वेळ, पैसा, श्रम, मानसिक त्रास खूप होतो. मानसिक त्रास या करता की घर बांधतांना खूपदा काही गोष्टी आणायच्या किंवा बांधकाम करायच्या राहून जातात आणि लग्नाची तयारी करताना एखादा जवळचा नातेवाईक मानपानाच्या कारणास्तव फुगून बसतो. अशी फिरकी घेणारी अवस्था माणसाची होत असते म्हणूनच म्हणतात की घर पाहावे बांधून आणि लग्न पाहावे करून.

लग्न म्हणजे काय?

तर लग्न हा फक्त २ जिवांचा मिलाप नसून तो २ परिवारांना एकत्र आणणारा एक सोहळा असतो ज्यात दोन्ही परिवारांत वैचारिक, सांस्कृतिक देवाणघेवाण होते. काही ठिकाणी लग्न हे एका सणाप्रमाणे साजरे केले जाते. ज्यात एखादी मुलगी पाहण्यापासून ते फार तिच्या बिदाई पर्यंतचा वेळ हा सण म्हणून आनंदाने साजरा होतो.

मुख्यत्वे आपल्या देशात पुरुषप्रधान संस्कृती आहे, ज्यात कोठे न कोठे तरी स्त्री ला डावललं जाते. तिच्या मर्जीविरूद्ध खूप गोष्टी केल्या जातात. तिला ना आपला नवरा कोण असावा याचं स्वातंत्र्य, ना आपलं मत मांडायचं स्वातंत्र्य. हल्ली मुलीचा पण विचार लक्षात

घेऊ लागले आहेत सुज्ञ पालकवर्ग. पूर्वीच्या काळी एखादा मध्यस्ती करणारा म्हातारा याचाच लग्नाबद्दल निर्णय अंतिम असायचा. मुलीला किंवा तिच्या आईवडिलांना त्या म्हाताऱ्यासमोर बोलण्याची हिम्मत होत नसे. पण आता काळ बदललाय, तोंडावर बरोबर ला बरोबर आणि चूक ला चूक म्हणणाऱ्या मुली सगळीकडे पाहायला मिळतात. आजच्या स्त्रिया फक्त चूल आणि मूल पर्यंत सीमित न राहता पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आपल्या परिवारास आर्थिक हातभार आणि देशाच्या विकासात योगदान देताना दिसून येत आहेत.

लग्न जमल्यापासून तर लग्न होईपर्यंत २-३ महिन्याचा कालावधी असतो. या कालावधीत साखरपुडा, बस्ता, हळद आणि नंतर लग्न असे सोहळे पार पडतात. साखरपुड्यापासून ते लग्नापर्यंत नवरा मुलगा आणि नवरी मुलगी एकमेकांना फोनवर बोलत अप्रत्यक्षपणे जाणून घेतात. सगळयात जास्त नवरी मुलीच्या वडिलांवर लग्नाचा भार असतो. आयुष्याची जमापुंजी तो आपल्या लाडक्या मुलीच्या लग्नाला लावून देतो. हुंडा पद्धत जरी अधिकृतपणे चालू नसली तरी छुप्या मार्गाने ती चालूच आहे. चांगल्या पदावर नोकरीला असलेला मुलगा भरमसाठ हुंड्याची मागणी करतो. तो जरी दिसायला चांगला नसला तरी त्याची नोकरी भाव खाऊन जाते. तो मुलीच्या बापाकडून पैसे घेतो आणि त्याच पैश्यांनी दिमाखदार पद्धतीने लग्न पार पाडतो.

आपली मुलगी सुखी राहील ह्या भरवश्यावर तो बाप त्या चांगल्या नोकरीवरच्या मुलाला मुलगी देतो. पण नंतर पैश्याची मागणी वाढत जाते आणि ते लग्न तुटतं. पण जर तीच मुलगी गरीब भाश्याला दिली तर तो मामाच्या आणि समजाच्या ओझ्याखाली काबाडकष्ट करून, त्या मुलीचे लाड पुरवतो आणि ते लग्न सार्थकी लागते.

लग्नाचं मुलीचं वय १८ वर्षे तर मुलाचे २१ वर्षे आहे. हे वय ठरवण्यामागचे कारण असे की मुलगा पदवीधर होतो म्हणजे कमावण्यालायक, जेणेकरून तो लग्नानंतर आपलं आणि आपल्या बायकोचं पोट भरू शकेल आणि मुलगी शारीरिक आणि मानसिक दोन्ही पद्धतीने कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यास सक्षम होते. काही ठिकाणी आजदेखील बालविवाह होताना दिसून येतात. यात मुलीचे वय १८ वर्षाखाली असते. यात ती मुलगी नाजाण, सशक्त नसलेली, संकटांना सामोरे न गेलेली, शारीरिकदृष्ट्या समर्थ नसलेली असते. अश्या नाजुक अवस्थेत जर का तीचं लग्न लावून दिलं तर ती संपूर्णपणे नाकाम ठरते. बालविवाह हा कायद्याने गुन्हा आहे, त्याकडे एक सुजाण नागरिक म्हणून प्रत्येकाने कटाक्ष टाकला पाहिजे. यात दोन्ही परिवाराचे नुकसान तर होतेच, त्यात त्या मुलीला आजीवन खूप यातना सहन कराव्या लागतात.

लग्न हा जरी दोन परिवारांच्या मिलनाचा एक सोहळा असला तरी त्यात दोन्ही म्हणजेच नवरा मुलगा आणि नवरी मुलगी यांचे मत

आजमावायला हवे. नाहीतर कोणाच्या मनात काही वेगळचं असते आणि होत काही वेगळचं. मानसिक तयारी झालेली असली तर ते लग्न टिकतं. मनाविरुद्ध लग्न झाल्यास अल्पावधीतच त्यांच्यात खटके उडू लागतात, दररोजची भांडणे होऊ लागतात. ते लग्न वेगळचं वळण घेऊन संपण्याच्या मार्गावर जाते. मनाविरुद्ध लग्न हे घटस्फोट, खावटी, फसवणूक, खून, आत्महत्या अश्या वेगवेगळया मार्गांनी कलाटणी घेते.

लग्न काय आहे तर तो एक सोहळा आहे, १५ दिवसांची लगबग आहे, लागलेली आतुरता, उत्सुकता आहे. नवीन संसार, नवीन स्वप्ने, नवीन उमेद, नवीन घर, नवीन लोक यांची सर्वांची केलेली गोळाबेरीज आहे. लग्न जरी मुलगा आणि मुलीचं होत असलं तरी त्यावर सर्वात जास्त प्रकाश टाकणारा घटक आहे तो म्हणजे समाज. (हो हा तोच समाज आहे तो सुखदुःखाच्या वेळी पाठ फिरवणारा असून काही चांगलं घडत असताना पाय अडकवणारा आहे. यात समाज म्हणजे मानवनिर्मित जात होय. ना की आपल्या सभोवतालचे लोक.) प्रेमविवाह ५% समाज स्वीकारतो तर जास्तीत जास्त वेळेस म्हणजेच ९५% नाकारला जातो. जुळवून आणलेला विवाह म्हणजेच अरेंज्ड मॅरेज समाजाला मान्य आहे. ज्यात पण आजकाल घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे.

परक्या जातीचा मित्र, मैत्रिणी, शेजारी, कामावरची लोकं आजच्या समाजाला चालतात, त्यांच्या सोबत गप्पा करतील, डब्बे

शेअर करतील, एकत्रितपणे सहलीला, चित्रपट पाहायला जातील, पार्ट्या करतील. त्यांच्या सोबत अगदी भाऊ बहिणीसारखे राहतील पण परक्या जातीतल्यांना सून किंवा जावई म्हणून आजचा समाज स्वीकारत नाहीत. किती आश्चर्याची गोष्ट आहे ना ही!

लग्नाचे वय हे एका उदाहरणावरून पाहू.

एक होता रमेश. चांगल्या पगाराच्या नोकरीवर होता. साहजिकच त्याला तो चांगला पगार मिळेपर्यंत खूप संघर्ष करावा लागला होता. त्याने इंजीनीअरिंग केली होती. नंतर मास्टर इन इंजीनीअरिंग पण पूर्ण केली होती. नंतरच्या २ वर्षाच्या अथक परिश्रमानंतर त्याला एका चांगल्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी मिळाली होती. यात झालं काय तर तो २९ वर्षाचा होऊन गेलेला. दिसायला काळाच होता. डोक्यावर टक्कल पडली होती. व्यस्त वेळापत्रकामुळे स्वत:कडे दुर्लक्ष केल्यामुळे डोक्यावरचे उरलेसुरलेले केस ही पिकले होते.

शिक्षण पूर्ण झालेलं, हाती चांगल्या पगाराची नोकरी, जीवन स्थिर झाले होते. आता गरज होती संसाररूपी गाडा ओढायला एका सहचारिणीची. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम सुरू झाला. रमेश स्थिरस्थावर झाला असल्याकारणाने येणारी स्थळे खूप होती. पण मुली नकार देत होत्या. काहींच्या मागण्या तर खूपच अवाक करणाऱ्या होत्या. गावाकडे राहणार नाही, नोकरीच्या ठिकाणी स्वत:चं घर

पाहिजे, मुलगा गोरा पाहिजे आणि अजून काही. पण रमेश अश्या कोणत्याच वर्गात बसत नव्हता. त्याला नेहमीच नकारघंटा ऐकू येत होती. रमेश दिसायला काका दिसत होता आणि मुली फक्त २३-२४ वर्षाच्या होत्या तर जोडी जमत नव्हती. खूप सारे विघ्न येत होते रमेशच्या लग्नाला. आधीच त्याचं वय खूप झालेलं आणि दिसायला खूप वयस्कर दिसत होता.

अश्या रीतीने लग्नाचे वय निघून गेले असताना खूप चिंतेने व्याकूळ असणाऱ्या रमेशचं एका विधवेशी लग्न झाले, ज्यात त्याने तिच्या जीवनाची दुसरी सुरुवात करून तिला एक नवीन दिशा दिली होती.

लग्नाचे वय असेपर्यंतच लग्न करून घेतलेलं बरं. नाही तर रमेश च्या जीवनात ज्या समस्या आल्या त्या आपल्या जीवनात पण येऊ शकतात. योग्य वेळी योग्य व्यक्तीशी लग्नगाठ बांधल्यास उर्वरित जीवन प्रवास आपल्या साथीदारासोबत सुखकर होतो.

म्हणून सांगतो करून घ्या लग्न, संपण्याच्या आत तुमचं लग्नाचं वय.....

# विधवेचे जीवन

आजच्या नव्या युगात म्हणजेच २१ व्या शतकात जरी आपण आधुनिकतेकडे वाटचाल करत करत असलो तरी वैचारिक पातळी मात्र १०० वर्षे जुनीच आहे. म्हाताऱ्या लोकांकडून म्हणा किंवा पूर्वजांकडून त्यांच्या काळात झालेल्या रूढी परंपरांचे वहन आजच्या नव्या पिढीत सुद्धा झाले आहे. लोक जरी मॉडर्न झाले असले तरी त्यांचे आचारविचार हे पूर्वीसारखेच आहेत. लोकांची विधवेकडे पाहण्याची दृष्टी १०० वर्षापूर्वी जशी होती तशीच आहे.

विधवा म्हणजे कोण?

विधवा म्हणजे अशी स्त्री जिचा पती मरण पावलेला आहे. अश्या पतिविरहित बेरंगी जीवनात रंग भरण्याचे कार्य म्हणजे विधवा पुनर्विवाह.

तसेच विधुर म्हणजे असा पुरुष ज्याची पत्नी मरण पावलेली आहे.

आपल्या जवळच्या व्यक्तिशिवाय जीवन व्यतीत करणे याचं दुःख फक्त तीच व्यक्ती समजू शकते ज्या व्यक्तीने कोणालातरी गमावले आहे. त्या दुःखाचा भार आयुष्यभर सोसत ती व्यक्ती आपले जीवन जगत

असते. सामाजिक जीवनापासून देखील अशी व्यक्ती वंचित ठेवली जाते.

आपली भारतीय संस्कृती अगदी पहिलेपासूनच पुरुषप्रधान अशी राहिली आहे. आपल्या संस्कृतीत पुरुषाला मानाचे स्थान असून स्त्रियांना एकदम दुय्यम वागणूक दिली जाते. बहुतांशी प्रदेशात तिला फक्त चूल आणि मूल येवढ्याकरीताच मर्यादित ठेवले जाते. नवरा जिवंत असून देखील अशी अवस्था असते तर नवरा मरण पावल्यावर त्या स्त्री ची काय भयाण अवस्था होत असेल याचा विचार करूनच अंगावर काटे येतात. अगदी आपल्या जवळचेच नातेवाईक खायला उठलेले असतात.

पुरुषप्रधान संस्कृती असल्याकारणाने विधुर माणसास बायको मिळते देखील आणि ती सुद्धा विनालग्नाची. त्याचा दूसरा संसार लगेच सुरू होतो, तो पण आनंदाने सर्व विसरून पुढच्या प्रवासास लागतो आणि या सर्वांमध्ये कोणी एक अवाक्षर देखील काढत नाही. याच्या बरोबर उलट त्या विधवा स्त्री सोबत घडतं. नवरा तर जिवंत नसतो पण तिला जर लग्न करायचे असल्यास तर हजार प्रश्न विचारले जातात जसे की, नवरा कसा मेला?, तुझ्यातचं काही खोट असेल, तूच संसारात अपूर्ण पडली असणार आणि बरेच काही. तिच्या चारित्र्यावर संशय घेतला जातो. तिला अपशकुनी म्हणून हिणवलं जाते. दुसऱ्या लग्नाची काय गरज? म्हणून ओरडले जाते. समजा लग्न झालचं तर ते देखील

एका वयाने मोठ्या असलेल्या, विधुर अश्या, व्यसनी माणसासोबत होते. म्हणजे त्या स्त्री च्या उर्वरित आयुष्यात देखील वेदना लिहून ठेवलेल्या असतात. काही स्त्रिया दुसरे लग्न देखील नाही करत.

विधवेच्या पुढे खूप हालअपेष्टा आ वासून उभ्या असतात. नाराज राहून, स्वत:चे मन मारून, सतत अपमान सहन ती उर्वरित आयुष्य जगत असते. तिला कोणत्याही कार्यक्रमात भाग घेण्याची मुभा नसते. नशिबाचे भोग ती भोगत असते. तिला पांढऱ्या पायाची, मुलगा गिळला असं सतत बोलून टोमणे मारले जातात. स्वत:च्या परिवाराकडून म्हणजेच सासू-सासरे, दीर, जेठ यांच्याकडून अर्वाच्य भाषेत नेहमी ऐकायला मिळते. पण ती स्त्री सर्व मुकाट्याने मूग गिळून सहन करत असते.

खूप एकटी असलेल्या विधवेचा मुलगा किंवा मुलगी लग्नाचे होतात तेव्हा त्यांना मदत करायचे सोडून नातेवाईक फक्त बघ्याची भूमिका घेतात. त्या आनंदाच्या काळात विघ्न घालून त्या विधवेची फजिती पाहण्याचे काम खूप लोकांकडून होते. त्या वेळेस तिला तिच्या नवऱ्याची कमी सर्वात जास्त खलते. ती विधवा स्त्री काही एक चांगलं करायला गेली, स्वत:च्या पायावर हिंमतीने उभी राहायला गेली तर तिचे जवळचे सख्खे नातेवाईक तिचे पाय खाली खेचतात. पण ती सर्व शारीरिक आणि मानसिक त्रास मुकाट्याने सहन करत आपल्या मुलांना बापाची कमी न होऊ देता सर्व काही करते. प्रसंगी ती सर्व लाइट बंद

झाल्यावर रडेल पण सर्वांसमोर एक आसवाचा टिपुस देखील बाहेर येऊ देत नाही. नंतर मूलं नोकरीला लागली तर जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान तिच्या चेहऱ्यावर दिसून येतं. मग समाजात कुठे मान ताठ होते तिची नाहीतर आहेच मन मारून जगणं.

त्या माऊलीच्या मनाचा विचार कोणी करत नाही.

एका उदाहरणावरून एका विधवेची करून कहाणी बघूया.

एक होती मंगला. लग्न होऊन झाली असतील १०-१५ वर्षे. पदारात २ गोंडस मुली पाडलेल्या असतात. नवरा चांगल्या पगारावर नोकरीला असतो. चांगली आवक असल्याकारणाने तिची समाजात शान असते. पण एकदा अचानक तिच्या नवऱ्याचं अपघाती निधन होतं. ती खूप रडते पण पोटच्या २ मुलींसाठी स्वत:ला सावरते आणि पुढचं जीवन फक्त त्यांच्या भवितव्यासाठी अर्पण करते. मुली मोठ्या होत असतात, घरच्यांचे सततचे टोमणे ऐकून हैराण झालेली मंगला कसेबसे दिवस लोटत असते.

मंगलाच्या जेठच्या मोठ्या मुलाचे लग्न ठरते. मंगलाचा नवरा मरण पावला असल्याकारणाने तिला इन्शुरंसचा पैसा मिळालेला असतो. तो तिने दोन्ही मुलींच्या लग्नासाठी आणि तिच्या म्हातारपणासाठी लावून धरलेला असतो. पण घरातील लोक भांडण करून तिच्या कडून २-३ लाख रुपये हडपतात. तरी देखील ती काही तक्रार न करता हसत हसत सर्व सहन करते. लग्नाचा माहोल असतो

घरी, नवीन वस्तु, नवीन कपडे घेण्याची लगबग असते सगळीकडे. पण मंगलाला कोणी एक विचारत नाही की तिला काही हवे आहे का? बिचारी घरातले सर्व कामे करत असते, जुन्या गोधड्या धुण्यापासून, सर्व भांडी घासेपासून ते थेट घर स्वच्छ करेपर्यंत सर्व आवरते. २ दिवसांनी घरात पूजा असते त्यावेळेस तिला मात्र एकदम खालच्या दर्जाची वागणूक मिळते. पूजेच्या पूर्ण दिवस भर तिला मागच्या खोलीतून बाहेर निघण्याची अनुमती नसते. बिचारी एकटी नवऱ्याला आठवत, त्याच्यासोबत घालवलेल्या प्रत्येक क्षणाची आठवण काढत रडत रडत दिवस घालवते. हळदीच्या दिवशी पण तसचं, सर्व सधवा स्त्रिया हसत असतात, हळद लावत असतात, नाव घेत असतात, आनंदित असतात. पण मंगला हे सर्व एका कोपऱ्यात उभी राहून सर्व बघत असते, वरवर चांगली वाटणारी मंगला आतून फार आक्रोश करत असते, नवऱ्याला बोलत असते, का गेला तू मला एकटीला सोडून? आणि जायचचं होतं तर मला पण घेऊन जायचं ना आणि अजून खूप काही. लग्न सोहळा पार पडतो तेव्हा पण मंगला मागे मागेच राहत असते. तरीही अजून एकदा घरचे लोक भांडण उकरून काढतात. मुलगा गिळला आणि अजून काही घालूनपाडून बोलतात. तरी सर्व सहन करत मंगला ऐकून घेते. तिला उत्तर देता येत नाही असे नसते, ती परिवाराच्या वाईट विचाराच्या ओझ्याखाली दाबली गेलेली असते. नंतर तिच्या मुलींचे लग्न होते, पण तेव्हाही कोणी एक नातेवाईक तिची मदत करत नाही. सर्व जण फक्त बघ्याची भूमिका घेतात.

वरील मंगलाच्या उदाहरणावरून असे दिसून येते की आजदेखील लोकांची मानसिकता बदलली नाही आहे, त्याच जुनाट विचारांनी प्रेरित असे लोक विधवा स्त्री ला मानाने जगू देण्यास असमर्थ ठरत आहेत. त्यावर विचारमंथन करण्याची गरज आहे.

असे होते दुःखमय, माणूस असून देखील जनावराची वागणूक मिळणारे एका विधवेचे जीवन.......

# बसचा प्रवास

बस म्हणजेच आपली एसटी. नुसतं बसचं नाव देखील काढलं तरी प्रत्येकाला आपण गावी कधी जाऊ याची चाहूल लागलेली असते, कारण गावी जाण्यासाठीचं आपल्याला माहीत असलेले एकमेव साधन म्हणजे बस होय. आजच्या काळात वाहतुकीची खूप सारी साधने उपलब्ध आहेत पण ती सर्व पैसेवाल्या लोकांसाठी, देशातील म्हणा किंवा आपल्या महाराष्ट्रातील गोर गरीबांसाठी बस हे एकमेव साधन अगदी जवळजवळ २४ तास सेवेस हजर आहे.

आपली निरंतर सेवा देण्यास बस ही सर्वदूर ओळखली जाते आणि आपलं काम ती उत्तमरीत्या अगदी चोखपणे बजावत असते. कष्टकरी गरीब लोकांची अगदी कमी मूल्यात सेवा बसकडुन होत असते. त्या सेवेला तोड नाही कारण इतर वाहतुकीची साधने वापरण्याची त्या लोकांची ऐपत नसते आणि इतर साधने त्यांना हव्या त्या ठिकाणी पोहोचवू शकत नाहीत. गरिबांची सेवेकरी म्हणून बस ओळखली जाते. ह्या स्वस्तात सेवा देणाऱ्या बसचे खूप उपकार गोरगरिबांवर आहेत. खूप महत्त्वाच्या काळात साथ देण्याचं काम ही बस करत आलेली आहे.

लालपरी असे टोपणनाव असलेल्या एसटीचे चालक आणि वाहक हे दोन मुख्य अंग आहेत. चालकाशिवाय बस इच्छित स्थळी पोहचू शकत नाही आणि वाहकाशिवाय बस कोणत्या ठिकाणी थांबवायची की पुढे चालू द्यायची हे सूचित होत नाही. म्हणूनच प्रत्येक अश्या बससाठी चालक आणि वाहक हे एक महत्वाचं कार्य पार पाडतात. आपण चालकाला बसचे हृदय आणि वाहकाला बसचा मेंदू म्हणू शकतो. शक्यतो बस ही लाल रंगातच दिसून येते, दुरवरूनही दिसून यावी यासाठी लाल रंग मारण्याचा उद्देश असू शकतो आणि बस मध्ये खूप सारे प्रवासी प्रवास करत असतात म्हणून समोरून येणाऱ्या वाहनास धोक्याची घंटा देण्यासही लाल रंग वापरला असावा. काही बसेस ह्या हिरव्या आणि पांढऱ्या रंगात दिसून येतात ज्या निम-आरामी किंवा पूर्ण आरामदायी असतात. ह्या हिरव्या बसेस रातराणी म्हणून ओळखल्या जातात ज्यांचे भाडेदेखील जास्त असते आणि त्यांचा वापर मुख्यत्वे करून लांब पल्ला गाठण्यासाठी केला जातो.

आसनव्यवस्था ५० ची असली तरी अजून १०-२० जणांना सामावून घेणारी ही बस कोणालाही नाराज न करता सर्वांना समान पद्धतीने प्रवासाचा लाभ उठवू देते. आधी ३*२ आसनं असलेल्या बसची जागा आता २*२ आसनं असलेल्या बसने घेतली आहे. जुन्या काळातील गाड्या व्यपगत होऊन त्यांच्या ऐवजी नवीन सर्व सुविधांनी सुसज्ज बस रोडवर धावतांना दिसत आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे सार्वजनिक वाहतुकीसाठीचं सर्वात जास्त सेवा देणारं

महामंडळ आहे. आजच्या युगात एसटी बरोबरच इतरही खाजगी बसेस सुरू झाल्या आहेत ज्या अजून चांगली सेवा देत आहेत. आपल्या एसटीची प्रमुख प्रतिस्पर्धी रेल्वे आहे, ही रेल्वे पण कमी भाड्यात दूरवरच्या ठिकाणी प्रवासी वाहतूक करण्यासाठी उपयुक्त आहे. रेल्वे ही फक्त जिथे रेल्वे रुळ आहेत तिथेच धावू शकते हे रेल्वेचा सर्वात मोठा तोटा आहे.

ह्या जगात सगळ्यात जास्त वाट बसची पाहिली जाते, लोक तासंतास वाट बघत उभे राहत असतात आणि एकदाची बस आली की सीट मिळवण्यासाठी धावाधाव सुरू होते. काही वेळेस सीटवरुन भांडणे देखील होतात. सामंजस्याने ते भांडण मिटवून पुढचा प्रवास सुखकर होतो. बस साठी प्रत्येक गावात एक एक थांबा असतो. मोक्याच्या ठिकाणी बसस्थानक देखील असते, जिथे सर्व गावी जाणाऱ्या बसेसचा थांबा असतो. काहीवेळेस खूप काही लोकांना उलटी, मळमळ सारखा त्रास होतो ज्याने इतर प्रवाश्यांचा देखील प्रवास खराब होतो. मद्यधुंद अवस्थेत जर चालक बस चालवत असला तर त्यावेळेस बसला अपघात देखील होतो.

इलेक्शन ड्यूटी च्या वेळेस मतदान केंद्रावर अधिकारी आणि मतपेट्या पोहचवण्यात बसच उपयोगी पडते. रस्ते आणि त्या वर पडलेले खड्डे यामुळे अपघात घडून शारीरिक आणि मानसिक इजा होऊन काही जण प्राणास देखील मुकतात. ठराविक लोकांच्या काही

एक मागण्या मान्य नाही झाल्यास ते रस्त्यावर उतरून दंगा, तोडफोड करतात. अश्या वेळेस ते बसला जास्त टार्गेट करतात. बस च्या काचा फोडतील, बस पेटवतील असे प्रकार दिसून येतात. यात बसेस जळून खाक होतात किंवा त्या डागडुजीकरून परत सेवेस हजर होतात.

सर्वांची निरंतर सेवा करून देखील बस च्या हाती काय येते, जाळपोळ, काचा फोडणे, तयार जाळणे. खूप वर्षांच्या निरंतर सेवेनंतर इतक्या दिवसात लॉकडाऊन मध्ये बसला कुठे आराम भेटला.

जुनी बस आणि आताची बस यांत कसा विरोधाभास आहे हे एका उदाहरणावरून पाहून घेऊया.

एक वृद्ध, अडाणी जोडपं आपल्या गावी जाण्यासाठी शहरच्या बसस्थानकावर गावी जाणाऱ्या बसची वाट बघत उभे असतात. संध्याकाळची वेळ असते. आज नेमकी काही कारणास्तव ती बस वेळेवर येत नाही आणि ती उद्याच येईल असे त्या आजोबांना सांगण्यात येत. गावाकडे जाण्यासाठीचा एकमेव साधन असलेल्या बसचा देखील पर्यायाची आशा बंद झाल्याने त्यांना नाईलाजास्तव संपूर्ण रात्र तिथे बसस्थानकातच काढावी लागते.

असाच एक पुण्याला नोकरी करत असणारा मुलगा त्याच्या शहराच्या बसस्थानकात येतो आणि तपास करतो तर बस चालली गेलेली असते. दुसऱ्या दिवशी सकाळीच बस निघणार असते. पण

त्याचं कामावर जाणं गरजेचं असल्याकारणाने तो खाजगी बसचा म्हणजेच ट्रॅव्हलने जाण्याचं पक्क करतो. खिशातून मोबाइल काढतो, रेडबस ॲप्लिकेशन वरुन तो आपली सीट बूक करतो, ऑनलाइन पैसे भरतो आणि लगेचच आपल्या प्रवासाला तिथून सुरुवात करतो.

वरील दोन्ही उदाहरणावरून असे दिसून येईल की तंत्रज्ञानाने अपडेट असलेला मुलगा लगेच प्रवास सुरू करतो आणि ते अडाणी वृद्ध जोडपे मात्र रात्रभर बस स्थानकावर ताटकळतात. बसचं मानवी जीवनात किती महत्व आहे हे यावरून दिसून येते.

# शेणामातीची झोपडी

आपण आजपासून जरा ७०-८० वर्षामागे जरा डोकावून पाहिलं तर हा काळ म्हणजेच आपल्या आजी आजोबाचा जीवनकाळ. ह्या काळात म्हणजेच भारताच्या स्वातंत्र्याचा काळात, भारत नुकताच स्वतंत्र झाला होता आणि त्या काळी सर्वात जास्त लोकसंख्या ही खेड्यात राहत होती. देशात आधुनिकीकरण झालेले नसल्याकारणाने सगळीकडे झोपड्यांचे साम्राज्य होते. स्वतंत्र भारतासमोर एक सर्वात मोठं लक्ष्य होते आणि ते म्हणजे गरीबी. जवळजवळ सर्वच जनता गरीब होती. हाताला काम नाही, पोटाला अन्न नाही अशी अवस्था होती.

आधीच्या काळात झोपडी हा एक मात्र निवारा होता, आज पण खूप काही मागासलेल्या प्रदेशात निवाऱ्याचं साधन म्हणून झोपडीकडे पाहिलं जाते. ह्या अश्या झोपडीला निवारा, घर म्हटलं जातं. कित्येक पिढ्यांचा वावर, काहींचे बाळंतपण, काहीचा जन्म तर काहींचा मृत्यू, काहींचे लग्न अश्या खूप साऱ्या गोष्टींना ही झोपडी साक्ष असते. झोपडीत नवीन जोडपे आनंदाने संसार करत असते, वृद्ध आईवडील आपल्या डोळ्यांसमक्ष आपल्या मुलांचं आणि नातवंडांचं जीवन अनुभवत असतात. मुलांचं बालपण खूप सारे हट्ट करत, त्यांचं शिक्षण पूर्ण होत झोपडीतचं गेलेलं असतं. पाहुण्यांचा अथेच्छ आणि

मनसोक्त पाहुणचार देखील ह्या तोडक्यामोडक्या झोपडीत झालेला असतो.

झोपडी म्हणजे चार भिंतीचं आणि वर गवताचं छप्पर असेलेल घर होय किंवा काहीवेळेस काड्यांनी विणलेल्या आणि छप्पर म्हणून गवताच्या झावळयांचा वापर केलेलं घर म्हणजे झोपडी होय. बाहेरून दिसायला जरी अचरटवचरट दिसत असलं तरी त्या घरातल्या लक्ष्मीने आतून छोटसं का होईना असं हे घर सुंदररीत्या सजवलेलं असतं. दररोज घर शेणाने सारवणे हा नित्यक्रम असतो त्या झोपडीत राहणाऱ्या मातेचा. शेणात काही औषधी गुणधर्म असतात. त्यामुळेच त्याचा उपयोग सारवण्यासाठी केला जातो, शेणाच्या गोवऱ्या जाळल्या जातात त्यामागे ही हाच एक उद्देश असतो की वातावरण शुद्ध करणे. काही एक सणवार आला की त्या घराच्या भिंती चुन्याने किंवा गेरूने रंगवल्या जातात, छोट्याश्या अश्या त्या झोपडीवजा घरात नवीन चैतन्याचा, नवनवीन गोष्टीचा आभास निर्माण होतो.

पावसाळ्याची चाहुल लागताच त्या झोपडीचे छत गळायला नको म्हणून त्यावर एकतर गवताच्या नवीन पेंडया अंथरल्या जातात किंवा त्यावर मुरूमरूपी माती टाकली जाते तिला खारी टाकणे म्हणतात. डागडुजी केल्यानंतर पुढच्या वर्षासाठी आपली सेवा देण्यासाठी ते घर म्हणजेच झोपडी छाती ठोकून उभी राहते. अश्या प्रकारे दरवर्षी डागडुजी करत ती झोपडी खूप साऱ्या पिढ्यांचं जीवनमान बघण्यासाठी साक्ष असते.

हाती पैसा आला की अश्या ह्या झोपडीचं आधुनिकीकरण केलं जातं. गवताचं छप्पर काढून पत्रे टाकली जातात. तरी देखील त्या झोपडीत अधिवास करणाऱ्यास ते खूप नवनवं वाटतं. पुढे परत हाती पैसा आला की त्या पत्र्याच्या घराचं रुपडं पालटून विटेचं आणि सिमेंटचं पक्क घर बांधलं जातं. खूप साऱ्या पिढ्यांना सहारा दिलेल्या झोपडीचं आता पक्क्या घरात रूपांतरण झालेलं असतं. नंतरचे रूप रो हाऊस, अपार्टमेंट मधील फ्लॅट असे असते. कालानुरूप हाती पैसा आला की गरज निर्माण होऊन माणसाची भूक वाढून घराच्या रचनेतदेखील बदल केला जातो.

आधी सारखी माणुसकी आता जपली जात नाही, जो तो ज्याच्या त्याच्या दुनियेत व्यस्त असतो. आधी सारखी आपुलकी नाही राहिली आता, ना ही तो एकत्र परिवार राहिला, ना ही मुलांना सुट्ट्या लागल्यावर मामाच्या घरी आजोळी महिनाभर जाण्याची ओढ राहिली. न्यूक्लियर फॅमिली चा कन्सेप्ट आलाय आताच्या काळात. ज्यात ४-५ लोकांशिवाय कोणी एक माणूस सहन नाही होत. आधीच्या काळात राहायला जरी एकच झोपडी असली तरी त्यात राहणारे १० जण असायचे. त्यात कोणी एक पाहुणा त्या झोपडीत गेला तर त्याचं आदरातिथ्य पण खूप जोरदार व्हायचं. आताच्या काळात राहायला ४ खोल्या आणि राहणारे चारचं जण अशी अवस्था आहे आणि अश्यातच २-३ दिवसकरता कोणी एक पाहुणा म्हणून गेला तर त्या चार जणांना अडगळीचं होतं.

झोपडीत सहसा न्हाणीघर बाहेरच्या बाजूला असते, ते पण एखाद्या प्लॅस्टिकच्या कागदाने बनवलेलं असते आणि ते वरच्या बाजूने उघडे असते. प्रात:विधीला मात्र उघड्यावर किंवा सार्वजनिक शौचालयात जावे लागते. याची काही जणांना लाज वाटते पण काय करणार, परिस्थिती माणसाला सर्व काही करण्यास भाग पाडते. यात सगळयात जास्त स्त्रियांची गैरसोय होते. सामाजिक विकृतीस त्या बळी पडतात. जीव मुठीत ठेवूनच त्यांना जीवन जगावं लागतं.

आजच्या युगात झोपडीत राहणाऱ्यास क्षुद्र म्हणून हिणवले जाते. अश्या प्रकारची हीनता सर्वदूर पसरवण्यास समाज हा घटक महत्वाचे कार्य पार पाडतो. अमुक अमुक जातीधर्माचे लोक ज्यांना समाजाने वाळीत टाकले आहे ही सर्व झोपडीत राहतात असा गोड गैरसमज समाज नावाच्या घटकाने करून ठेवलेला आहे. हाती पैसा नाही तर समाजात मान मरातब नाही आणि लोकांच्या सहकार्याने काही एक काम धड होत नाही कारण माणूस हा सामाजिक प्राणी आहे. हाती पैसा आला तर इतर गोष्टी आपोआप चालून येतात जसे की समाजात इज्जत वाढते, खूप काळापासून निवाऱ्याचे साधन असणाऱ्या झोपडीचे रूप पालटून झोपडी ते पक्के घर असा प्रवास चालू होतो आणि अंतिमत: आधी कधीही झोपडीत पाय न ठेवलेल्या नातेवाईकांची, मित्रपरिवाराची आणि पाहुण्यांची वर्दळ सुरू होते.

झोपडीतील आणि फ्लॅटमधील रहिवासी यांची मानसिकता उदाहरणाद्वारे पाहूया.

एक असतो नाम्या, झोपडीत राहणारा एकदम सामान्य कुटुंबातील मुलगा. आणि एक असतो राजा, एका नामांकित सोसायटीत ३ बीएचके फ्लॅट मध्ये राहणारा श्रीमंत घरातील मुलगा. दोघांची कहाणी एकदम विरुद्ध.

नाम्याच्या घरी जरी वस्तु कमी असल्या तरी मात्र मनाचा मोठेपणा खूप होता. त्याचे खूप सारे मित्र होते. प्रत्येकाच्या सुखदुःखात त्याची आवर्जून उपस्थिती राहायची. तो प्रत्येकाला आपला भाऊ मानत असल्याकारणाने त्यांच्याबद्दल नाम्याला खडानखडा माहिती असायची. कोणी एक मित्र घरी आला तर तो जेवल्याशिवाय परत जात नसे. नाम्याच्या आईला ही स्वयंपाकाचा कंटाळा नव्हता, ती माऊली जेवढे जण घरी आले त्यांना यथेच्छ पाहुणचार करत असे.

राजाच्या घरी नाम्याच्या अगदी उलट परिस्थिती होती. राहायला आलिशान घर, घरात खूप साऱ्या चैनीच्या महाग वस्तु होत्या. पण इथे माणुसकीला थारा नव्हता. घरातील सर्वच्या सर्व जण खूप अहंकारी होते. कोणी एक मित्र घरी आला तर राजा त्याला इथे हात नको लाऊ तिथे हात नको लाऊ अश्या प्रकारे वागवत असे. काही एक चूक झाल्यास राजाची आई कडक शब्दात रागवत असे. काही वेळा लज्जास्पद शब्दांत अपमानित पण करत असे. जेवणाचा प्रश्न तर दूरच होता साधा चहा देखील विचारला जायचा नाही.

वरील दोन्ही उदाहरणावरुन असे दिसून येतं की जर जवळ पैसा असला तरी तो माणूस माणुसकी दाखवेलचं असं नाही. आपण जरी

झोपडीत राहत असलो तरी आपले कर्म आपण सुरू ठेवले पाहिजे, एक दिवस नक्की येतो की त्या झोपडीचं एका छान टुमदार पक्क्या घरात रूपांतर होते आणि आपले जीवन सुखकर होते.

# मोबाइल आणि तंत्रज्ञान

आजच्या युगात सर्व पृथ्वीवासीयांचे जीवन मोबाइलमय झालेलं दिसून येतं. अन्न, वस्त्र, निवारा यांच्या नंतरची चौथी मूलभूत गरज मोबाइल झालेली आहे. जवळजवळ प्रत्येक घरात एक न एक तरी मोबाइल आहे. मोबाइलच्या वापरामुळे जीवन सुखकर जसे झाले आहे तसेच त्याचे काही तोटेसुद्धा आहेत.

मोबाइल हे असे एक साधन आहे ज्याद्वारे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी संदेशाचं वहन होऊन ते साधन पण एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी सहजगरीत्या नेल्या जातं म्हणून त्यास मोबाइल म्हणतात. मोबाइल आधी टेलीफोन वापरला जायचा, पण आजच्या जगात मोबाइललाच सर्वात जास्त पसंती दिली जाते.

२००० ह्या वर्षाआधी मोबाइल सर्वदूर अस्तित्वात नव्हता. एकविसावे शतक एक क्रांती घेऊन आली आणि त्या क्रांतिने जग पालटून गेले, जगाच्या कुठल्याही ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी संपर्काचं माध्यम उपलब्ध झाले. जग जवळ आले. जगातील लोक जवळ आले, त्यामुळे व्यापारास चालना मिळून वस्तु आणि सेवांची देवाणघेवाण सुरू झाली. मोबाइल ने आवाजचं काय, माणूस एकमेकांना खूप अंतरावरून देखील पाहू लागला.

आधीच्या काळी संपर्काची आणि दळणवळणाची साधने खूप कमी होती ज्यामुळे माणसा-माणसांत आपुलकी होती. पत्रव्यवहाराने काही एक संदेश पोहचवला जायचा मग तो कोणाच्या जन्माचा असो, कोणाच्या खुशहालीचा असो किंवा कोणाच्या मरणाचा. नवीन लग्न झालेली मुलगी आपल्या माहेरपासून सासरी खूप दूर राहत असल्याकारणाने ती सकाळ-संध्याकाळ फक्त पोस्टमनची वाट पाहत राहायची आणि पोस्टमन दिसला रे दिसला की आनंदित व्हायची आणि त्याला आवर्जून विचाराची की, “दादा, आमचं पत्र आले आहे का?” काही वेळा तिचा भ्रमनिरास व्हायचा. खिन्न मनाने घरातली कामे करायची. त्यावेळेस ही पोस्टाची सेवा उपभोगायला खूप कमी खर्च यायचा. त्या काळी लोकांच्या अंगी सहनशक्ती खूप जास्त होती. ते लोक खूप काळ वाट बघत राहायचे आणि नंतरच काही एक तो निर्णय घ्यायचे.

लोकांच्या जडणघडणीत वर्तमानपत्रे यांचा देखील खूप मोठा वाटा असतो. त्या काळी वर्तमानपत्रे देखील खूप कमी असायची, त्यांचा लाभ फक्त शहरातील लोकांनाच जास्त व्हायचा. ग्रामीण भागातील जनता मात्र ह्या सेवेपासून वंचित राहायची. वर्तमानपत्रे आणि तंत्रज्ञानाची व्याप्ती कमी असल्याकारणाने लोकांमध्ये मागासलेपणा खूप होता. परिणामी गरिबीचं संकट भारतासारख्या विकसनशील आणि नुकत्याच स्वतंत्र झालेल्या अश्या देशासमोर उभं ठाकलेलं होतं. शिक्षणाचा अभाव सुद्धा त्या काळी खूप जाणवायचा. शिक्षण कमी

असल्याकारणाने खूप लोक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास कमी पडत असत.

वरील परिस्थितीच्या अगदी विपरीत परिस्थिती २००० सालानंतर बदलली. लोकांच्या हाती थोडा फार पैसा येऊ लागला होता, लोक शिकून साक्षर झालेले होते, त्यांना जगाबरोबर चालायचे असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही याची जाणीव झाली होती. हाती पैसा असल्याकारणाने ते हवी ती गोष्ट विकत घेऊन त्याचा उपभोग घेऊ शकत होते. ह्या दशकात संपर्काची आणि दळणवळणाची खूप सारी साधने उपलब्ध झाली होती. मोबाइल नावाचा आविष्कार सामान्य जनता अनुभवायला लागली होती. आजच्या घडीला फ्लिपकार्ट आणि अमेझोन सारख्या ई-कॉमर्स कंपन्या सेल लावून प्रत्येक ३० सेकंदाला १ मोबाइलची विक्री करत आहेत. यावरून आपल्याला अंदाज येईल की माणसाच्या जीवनात मोबाइलचं महत्व किती वाढलं आहे.

आजच्या घडीला मोबाइलचे शंभरवर जास्त ब्रॅंड उपलब्ध आहेत. कोणाला कॉल करण्यासाठी, फोटो, विडियो पाठवण्यासाठी मोबाइलचा वापर होतो. जसे फायदे आहेत तसेच तोटेदेखील आहेत, जसे की बलात्काराच्या घटना, एकतर्फी प्रेमातून ॲसिड हल्ला, खून असे काही विघातक कार्ये देखील घडून येतात. शॉर्टकट काम करायच्या नादात खूप जणांचे आयुष्य बरबाद होऊन त्यांचे करियर खराब झाले आहे.

तंत्रज्ञानाचा वापर बँक, अंतराळ, शैक्षणिक संस्था आणि उरलेल्या सर्वच ठिकाणी केला जातो. इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे. इ-पास, इ-वाहन, ए-लर्निंग ह्या मुले कोविड१९ सारख्या महामारीत देखील घरातून काम शक्य झाले आहे. ज्यामुळे खूप कमी तोटा सहन करावा लागलाय. इंटरनेटचा वापर करून जगाची ओळख एका क्लिक वर होते.

तंत्रज्ञानाचा आपल्या जीवनात कसा बदल घडून येतो हे एका उदाहरणावरून पाहूया.

एका शेतकरी कुटुंबातील मुलाला दुबई मध्ये खूप चांगल्या पगाराची नोकरी मिळते, अर्थातच त्यासाठी त्याच्या आईवडिलांनी जिवाचं पाणी केलेलं असतं आणि त्याची जाणीव त्या मुलाला पूर्णपणे असते. तो देखील आपल्या आईवडीलांचे कष्टाचे चीज करतो आणि त्यांना सर्व सुख देईल असं मनाशी ठरवतो, त्यांची म्हातारपणात ओढाताण होणार नाही म्हणून सर्व योजून ठेवतो, त्या मुलाचं लग्न होते तो बायकोला घेऊन दुबई चालला जातो.

आईवडील इकडे गावाकडेच असतात. त्या मुलाकडे सर्व एकदम अपडेटेड वस्तू असून घरातपण सर्व उपयोगी वस्तू असतात. त्या मुलाला तिथं एक मुलगा होतो, तो छोटासा मुलगा सर्व जाणून असतो लहानपणापासूनच. त्याला सर्व गोष्टी अवगत असतात. तो नेहमी मोबाइल, आय-पॅड वापरणारा पूर्णपणे तंत्रज्ञानाशी एकरूप झालेला असतो.

अश्यातच त्या दुबईत नोकरी करणाऱ्या मुलाचे आईवडील दुबईला येतात. आजोबाचा नातू तर खूप अपडेटेड असतो. तो आजोबाला टीव्ही चालू आणि बंद करण्यास शिकवतो आणि आजोबा पण ते शिकतात. दिवसामागून दिवस जात असतात, आजी आजोबा त्या घरात रुळतात पण तरी ते नवीन गोष्टी शिकण्यास कमी पडतात. सूनबाई सुद्धा नोकरी करत असते ती सकाळी लवकरच चालली जाते तरी ती सर्व आवरून जाते.

एका दिवशी तिच्या ऑफिसमध्ये मीटिंग असल्याकारणाने ती लवकर निघून जाते पण घरी मात्र आजी आजोबांची खुप दमछाक होते. त्यांना गावाकडे फ्रीझ वगैरे माहिती नसते. त्यांना भूक लागलेली असते तरी ते हिम्मत करून फ्रीझ उघडतात पण त्यात फक्त ब्रेड शिल्लक असतात. घरी कोणीच नसतं त्यांना ओव्हन कसा वापरायचा माहीत नसतं. फोन करून कोणाला बोलवून घेतील तर मोबाइल कसा वापरतात याचं देखील त्यांना ज्ञान नसतं. ते बसतात तसेच उपाशी दिवस भर. ४-५ वाजता नातू आल्यावर ते त्याला सांगतात की भूक लागलीय आणि आम्ही काहीच खाल्लं नाहीय. तेव्हा तो नातू त्यांना ओव्हनमध्ये ब्रेड गरम करून देतो आणि त्यांना मोबाइल किंवा घरचा फोन कसा वापरायचा हे शिकवतो. मग नंतर त्यांना काही अडचण आली तर ते मुलाला किंवा सुनबाईला कॉल करून विचारून घेतात. अश्या प्रकारे गावातून आलेले आजी आजोबा तंत्रज्ञान नातवाकडून शिकून आपले उर्वरित जीवन सुखकर करतात.

ह्या वरील उदाहरणावरून असे दिसून येत की जरी आपण जीवन आपल्या तर्हेने जगत असलो तरी आपल्याला ह्या बदलणाऱ्या जगात खूप लवकर तंत्रज्ञानाशी नाळ जुळवून घ्यावी लागते. आपले जीवन सुखकर करण्यासाठी माणसाने खूप शोध लावले ज्याद्वारे माणसाचे शारीरिक श्रम कमी झाले पण त्यास त्याची बौद्धिक क्षमता वाढीस लावावी लागली. आपल्या बुद्धीचा वापर करून त्याने खूप काही गोष्टी सोप्या केल्या आहेत जेणेकरून त्याचे कष्ट वाचतील आणि तो अजून काम करू शकेल.

ह्या बदलत्या जगात ज्याने तंत्रज्ञानाशी मैत्री केली तो टिकला नाही तर तो जगलाच नाही असे म्हणण्यास काही वावगे ठरणार नाही.....

# कामापूरता मामा

मराठीत एक म्हण आहे 'कामापूरता मामा', ज्याचा अर्थ असा आहे की एखाद्याकडून काम काढून घेण्यासाठी त्याची हाजी हाजी करणे आणि काम झाल्यावर त्यास ओळख देखील न दाखवणे. यात पाहिलं असता दोष कोणाचा? हा प्रश्न समोर येतो, दोष मामाचा, की कामाचा, की काम काढून घेणाऱ्याचा? आजकालच्या युगात आपल्याला फसवणुकीच्या, धोकाधडीच्या घटना घडलेल्या पाहायला मिळतात.

आजची लोकांची वृत्ती खूप बदलली आहे, काही एक काम असल्यास ज्याच्याकडून काम करवून घ्यायचे आहे त्या समोरच्या माणसाची खूप वाहवा करणे, त्यास गोड बोलून उच्च शिखरापर्यंत घेऊन जाणे आणि आपलं काम करून घेणे. ठीक आहे तुमचे काम झाले तर ते काम करून देणाऱ्या माणसाप्रती आपल्या मनात कृतज्ञता तर बाळगा. तो मनुष्य कुठे भेटला तर त्याने आपल्यावर, आपल्या कठीण प्रसंगी मदत करून केलेल्या उपकाराचे मोल आपल्यास आहे याची जाणीव त्याला करून दिल्यास पुढे अजून मदत करण्यास तो मनुष्य पुढे सरसावेल.

आपले सख्खे नातेवाईक देखील काम झाल्यावर तू कोण आणि मी कोण? ह्या वृत्तीचे झाले आहेत. काम काढून घेतल्यावर त्या माणसाला साधा धन्यवाद तर सोडाच हो पण साधा फोन करून, एखादा मेसेज करून किंवा मेल करून साधी खुशहाली देखील विचारत नाहीत. यात एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोण्या एका कार्यक्रमात भेटले तर आपली मान खाली नको जायायला, चारचौघात आपल्या इज्जतीचा पंचनामा नको व्हायायला म्हणून लाजेखातर इतर लोकांशी बोलतांना हा माझा किंवा माझी असा असा नात्यातला आहे आहे आवर्जून सांगतात. प्रत्यक्षदर्शी असे दिसून येते की वाह! काय जिव्हाळा आहे, काय आपुलकी आहे, पण लोकांस काय ठाऊक की त्या माणसाचे खाण्याचे दात आणि दाखवण्याचे दात वेगवेगळे आहेत.

लोकांची वृत्ती खराब झाली आहे, काम करण्याची दानत दिसून येत नाही. सर्वदूर फक्त कृतघ्नतेचा महापूर आलेला दिसून येतो आणि ह्या अश्या महापुरात चांगल्या भावनेने आणि चांगल्या मनाने मदत करणाऱ्या लोकांचा देखील काडीमोड होऊन ते लयास गेलेले दिसून येतात. मुंबई सारख्या एकदम गजबजलेल्या शहरात गावाकडचा एखादा माणूस गेल्यास तिथे राहणारे नातेवाईक साधी ओळख देखील दाखवत नाहीत, त्यांच्या घरी चहापानास बोलवून आदरातिथ्य करण्याची गोष्ट तर दूरच राहिली.

मनुष्य जसे कार्य करतो तसे त्याला फळ मिळते हे देखील आपण ऐकून आहोत. तुम्ही तुमचे कार्य करीत रहा, फळाची चिंता करू नका, आज नाही तर उद्या ते भेटणारच आहे. एखादे कार्य करत असताना माणसाने कृतज्ञतेची वृत्ती जोपासली तर ते कार्य पूर्ण झाल्यावर त्यास जे काही मानसिक समाधान मिळते ना त्यास ह्या संपूर्ण जगात कुठेही तोड नाही आहे.

आजकालच्या एकदम जलद असलेल्या युगात आपली आपल्या नातेवाईकांशी संपूर्ण वर्षात एकदा भेट होते. त्या भेटीत समोरच्याची हालचाल विचारण्याऐवजी त्यास २-३ वर्षापूर्वी घडलेल्या गोष्टीची आठवण करून देऊन, जुन्या कुरापती, जुनी भांडणे उरकून काढण्याचा खूप लोकांचा कल असतो. जो पाहुणा आपल्या घरी आलाय, तुम्ही जर त्याच्यासाठी काही चांगलं करू शकत नसाल तर निदान जुनी भांडणे उरकून, जुन्या वाईट आठवणी काढून त्याचा दिवस तरी नका खराब करू. तो व्यक्ती त्या वेळेस भलेही काही बोलणार नाही पण त्या खिन्न मनाने त्याच्या घरी जाऊन परत त्या नातेवाईकाकडे जाण्यास धजावणार नाही.

लोकांचा आपल्याच जवळच्या माणसांच्या बाबतीतला कमी असलेला विश्वास लगेच दिसून येतो. जवळील कोणी काही एक चांगलं काम करण्यासाठी पुढे धजावलं तर लगेच मात्र त्याचे पाय त्या नातेवाईकांकडून खाली खेचले जातात. कोणाचं काही चांगलं घडणार

असेल तर मात्र त्यात पाय अडवून त्याला ते करण्यापासून कसे रोखले जाईल यावर विचारविमर्श त्या लोकांकडून केला जातो. यातच त्यांची जळाऊ वृत्ती दिसून येते. आपली नाही ना प्रगती होत आहे तर इतरांनादेखील त्यापासून वंचित ठेवता येईल याचा सारासार विचार त्या लोकांकडून केला जातो.

काम करवून घेण्यासाठी लोक गोड बोलून, पाया पडून, गयावया करून समोरील व्यक्तीस तसे करण्यास भाग पाडतात. नंतर कामापश्चात त्या व्यक्तीबद्दल कसलाही आकस न बाळगता त्यास त्याच्या पाठीमागे घालून पाडून बोलतात. वेळेप्रसंगी तोंडावर देखील अपशब्द वापरण्यास मागेपुढे बघत नाहीत. जरी काम दुसऱ्या कोणाएका माणसाने केलेलं असल्यास तरी त्या कामाचं क्रेडिट, त्या कामाचा मोबदला मात्र स्वत: घेऊन इतर जनमाणसांत स्वत:ची वाहवा करून घेतात. असे खाण्याचे आणि दाखवण्याचे दात वेगवेगळे असणाऱ्या लोकांपासून सावध राहिलेलं बरे. अशी लोकं आपल्या जवळच्या विश्वासाच्या लोकांना दूर सारून इतर परक्या लोकांना जवळ करून आम्ही किती चांगले वागतो याचा भास निर्माण करून स्वत:ची पोळी भाजून घेतात.

ह्या मिथ्या जगात खूप सारी माणसे आपल्याला भेटतील, त्यातील खूप काही माणसे ही फक्त स्वार्थापोटी, स्वत:चे काम पूर्ण करवून घेण्यासाठी, स्वत:चा दगडाखालील हात बाजूला काढून

घेण्यासाठी आपली वाहवा करून काम झाल्यानंतर परक्याची जाणीव करून देतील. अश्या वेळेस वेळीच सावध होऊन स्वत:चे मानसिक आणि शारीरिक खच्चीकरण होण्यापासून स्वत:ला वाचवले पाहिजे.

तोंडावर एक आणि पाठीमागे एक बोलणाऱ्या व्यक्तींसोबत नेहमीच आजच्या भाषेत सोशल डिस्टन्स ठेवा कारण अशी लोकं कोरोनापेक्षाही जास्त घातक असतात.

## ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.
## पवन सोनवणे यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक.

पवन सोनवणे एक विद्यार्थी आहेत. अजून जग पाहिले नाही असे म्हणता येईल असे त्यांचे वय आहे. पण त्यांचे प्रगल्भ विचार वाचल्यावर त्यांच्याबद्दल असं कोणी म्हणणार नाही. उद्याच्या जगात यशस्वी होण्यासाठी जी काही वैचारिक आयुधं लागतात त्यांची भक्कम तयारी त्यांनी केली आहे. ते मॅनेजमेंटचे परिक्षार्थी नाहीत तर खरे खुरे विद्यार्थी – विद्येचे उपासक आहेत.  आणि आपले मेहनतीने कमावलेले विचार ते मुक्त हस्ते उधळू इच्छितात.

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे जावे,
एक दिवस घेता घेता, देणाऱ्याचे हातच घ्यावे.
ही त्यांची वृत्ती आहे.
जे जे आपणासी ठावे , ते ते जनांसि सांगावे,
शहाणे करून सोडावे , सकळ जन॥

हा त्यांचा ध्यास आहे. पवन सोनवणेसारखे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव,

अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?